## उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी/शर्ती व सूचना :

१) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची मागणी विहित कालावधीत करणारे विद्यार्थीच पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करू शकतील.

२) पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्याने स्वहस्ताक्षरात व विहित नमुन्यात संबंधित विभागीय मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक असेल.

३) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीच्या शुल्काशिवाय विद्यार्थ्यास पुनर्मूल्यांकनासाठी प्रती विषयास रू.३००/- अधिक अर्जाचे शुल्क रू.१०/- या प्रमाणे शुल्क रोखीने / राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे मंडळाकडे जमा करावे लागेल. शुल्क मनीऑर्डर किंवा पोस्टल ऑर्डरद्वारे स्विकारले जाणार नाही. भरणा केलेले शुल्क नापरतावा असेल.

४) जास्तीत जास्त तीन विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल.

५) पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करू इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी त्यांना उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेवून जाण्याची सूचना विभागीय मंडळाकडून मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसात छायाप्रत समक्ष येवून घेवून जाणे बंधनकारक असेल.

६) पुनर्मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसाच्या आत आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकाकडून नमुना उत्तरे व गुणदान योजनेप्रमाणे उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक असेल. विषय शिक्षकाकडे नमुना उत्तरे व गुणदान योजना उपलब्ध नसल्यास त्यानी जवळच्या माध्यमिक शाळेमध्ये / उच्च माध्यमिक शाळेमध्ये / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये संपर्क साधून नमुना उत्तरे व गुणदान योजना प्राप्त करून घ्यावी. हे शक्य न झाल्यास त्याने विभागीय मंडळाशी संपर्क साधून विभागीय मंडळाकडून प्राप्त करून घ्यावी.

७) पुनर्मूल्यांकन करू इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकाकडून तपासून घ्यावयाची असल्यामुळे सदर कालावधीत शिक्षक उपलब्ध होण्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. कोणताही इच्छूक विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाच्या सुविधेपासून वंचित राहू नये म्हणून उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी आपल्या माध्यमिक शाळेतील /उच्च माध्यमिक शाळेतील/ कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकांकडून करून घेवून विषय शिक्षकाचा अभिप्राय प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

८) विषय शिक्षकाचा अभिप्राय हा मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात असावा.

९) विद्यार्थ्यास केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी मागणी करता येईल. तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन, प्रकल्प लेखन ऑनलाईन परीक्षा असलेले विषय किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

१०) पुनर्मूल्यांकनाच्या अर्जासोबत संबंधित विषय शिक्षकाने तपासणी केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत, विषय शिक्षकाचा विहित नमुन्यात अभिप्राय, संकेत स्थळावरील गुणांची अथवा गुणपत्रिकेची प्रमाणित छायाप्रत, विहित शुल्कासाठी रोख भरणा पावती / राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष सादर करणे आवश्यक राहील.

११) इ.१० वी / इ.१२ वीच्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी त्यांनी परीक्षेचे आवेदन सादर केलेल्या संपर्क माध्यमिक शाळेतील/ उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून करून घेवून त्यांच्याकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत जोडावेत.

१२) ज्या विषयात दोन पेपर/भाग आहेत अशा विषयाच्या बाबतीत विद्यार्थ्यास दोन्ही पेपरच्या/ भागाच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची तपासणी आपल्या माध्यमिक शाळेतील/उच्च माध्यमिक शाळेतील/ कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकांकडून करून घेवून त्या दोन्ही पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेबाबतच्या अभिप्रायासह पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे बंधनकारक असेल. केवळ एका पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१३) परिपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक कागदपत्रासह व शुल्कासह विद्यार्थ्यास विहित कालावधीत स्वत: किंवा प्रतिनिधीमार्फत संबंधित विभागीय मंडळाकडे समक्ष सादर करावा लागेल. [illegible] जाणार नाही.

१४) उत्तरपत्रिकेचे एकदा पुनर्मूल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेची पुन:श्च गुणपडताळणी, पुनर्मूल्यांकन किंवा छायांकित प्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१५) पुनर्मूल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास माहितीच्या अधिकारातही करता येणार नाही.

१६) दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांनाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी व पुनर्मूल्यांकनासाठी विहित शुल्क भरावे लागेल.

१७) पुनर्मूल्यांकनात गुणात बदल झालेल्या प्रकरणी फक्त बदल झालेल्या विषयासाठी विद्यार्थ्याने भरलेले पुनर्मूल्यांकन शुल्क परत दिले जाईल.

१८) वस्तुनिष्ठ प्रश्नाच्या (उदा.रिकाम्या जागा भरा, जोडया लावा, योग्य पर्याय निवडा, चूक की बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राहय धरण्यात येईल.

१९) वस्तुनिष्ठ प्रश्न सोडून इतर सर्व प्रश्नासाठी एकत्रितरित्या त्या पेपरमध्ये पूर्वी मिळविलेल्या गुणांच्या (मुळ गुणांच्या) किमान पाच टक्के कमी किंवा जास्त गुण पुनर्मूल्यांकनात झाल्यास सुधारित गुण ग्राहय धरण्यात येतील. पाच टक्क्यापेक्षा कमी गुण बदल प्रकरणी गुणात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यास "नो चेंज" असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

२०) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्यांच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास पाच टक्के किंवा अधिक गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल व संपादणूक कायम ठेवून त्यास * नो चेंज* असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

२१) उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. त्यानुसार पुनर्मूल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्यांची संबंधित विषयाची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक स्विकारणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

२२) पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व संबंधित माध्यमिक शाळेस / उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार विद्यार्थ्याचे मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक देण्यात येईल.

२३) एखाद्या विषयात सवलतीचे गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झालेला असेल व अशा विद्यार्थ्याने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला व पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याचे पाच टक्के किंवा अधिक गुण कमी झाल्यास व त्यामुळे विद्यार्थी सवलतीच्या गुण सवलतीसाठी अपात्र ठरल्यास अशा प्रकरणी संबंधित विद्यार्थ्याचा निकाल उत्तीर्ण ऐवजी अनुत्तीर्ण असा जाहीर करण्यात येईल.

२४) पुनर्मूल्यांकनातील गुण वाढीमुळे विद्यार्थी सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

२५) पुनर्मूल्यांकनाचा अर्ज, त्या सोबत सादर करावयाची कागदपत्रे व आवश्यक शुल्क मंडळाने निर्धारित केलेल्या मुदतीमध्ये संबंधित विभागीय मंडळाकडे समक्ष जमा करणे आवश्यक असेल. मुदतीत शुल्क भरले असेल, परंतु अर्ज व त्या सोबत सादर करावयाची कागदपत्रे निर्धारित मुदतीत जमा न केल्यास अशा प्रकरणी पुनर्मूल्यांकनाची कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व असे अर्ज न स्विकारता परत केले जातील.

२६) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाची वाट न पाहता पुढील परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी विहित मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधित विभागीय मंडळाकडे माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळेमार्फत / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

२७) एखाद्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्याने जर पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल व त्याचवेळी त्याने पुढील परीक्षेसाठी आवेदनपत्र भरले असेल आणि पुनर्मूल्यांकनानंतर जर त्याचा परीक्षेचा निकाल बदलला तर त्याने भरणा केलेले संपूर्ण शुल्क (परीक्षा शुल्क व इतर) त्याला परतावा म्हणून देण्यात येईल.

२८) उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनाची अतिरिक्त सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येत असल्याने पुनर्मूल्यांकनाच्या कार्यवाहीस विलंब होवून विद्यार्थ्यास पुनर्मुल्यांकनाचा निकाल देण्यात विलंब झाल्यास होणा-या संभाव्य परिणामास / शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

रू.१०/-

# उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी करावयाचा अर्ज
## माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा
## फेब्रुवारी-मार्च/सप्टेंबर-ऑक्टोबर २०१

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्ज नोंदणी क्रमांक | |
| प्रकरण क्रमांक | |

प्रति,
मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
------------------विभागीय मंडळ,
------------------

महोदय,

मी खालील सही करणार विनंती अर्ज करतो/करते की, मी फेब्रुवारी-मार्च/सप्टेंबर-ऑक्टोबर २०१ च्या माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ट झालो/झाले होतो/होते. सदर परीक्षेच्या माझ्या खालील विषयाच्या उत्तरपत्रिका /उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी मी प्रति विषय रू.३००/- (रूपये तिनशे मात्र) व पुनर्मूल्यांकन अर्जाचे शुल्क रू.१०/- प्रमाणे शुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशील खालील प्रमाणे-

| परीक्षा बैठक क्रमांक | परीक्षार्थीचे पूर्ण नाव | शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| पिनकोडसह पूर्ण पत्ता | | |
|---|---|---|
| | | |
| तालुका : | जिल्हा : | पिनकोड नंबर : |
| भ्रमणध्वनी (मोबाईल क्र.) : | | |

### उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याबाबतचा तपशील

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषय कोड | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

सदर अर्जासोबत विषय शिक्षकाचा अभिप्राय, विषय शिक्षकांनी तपासणी केलेल्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती, संकेत स्थळावरील गुणांची/गुणपत्रिकेची व प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत इत्यादी कागदपत्रे जोडली आहेत.

| उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषय ची एकूण संख्या | भरलेले शुल्क प्रती विषय रू.३००/- प्रमाणे व अर्जाचे शुल्क रू.१०/- | भरलेल्या शुल्काचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी.डी.क्रमांक | रोख रक्कम भरणा पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | | |

वर दिलेली माहिती खरी असून पुनर्मूल्यांकनासाठी मंडळाने निर्धारित केलेल्या अटी / शर्ती व सूचना मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :

ठिकाण :

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
------------- विभागीय मंडळ, -------------

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्ज नोंदणी क्रमांक | |
| प्रकरण क्रमांक | |

# उत्तरपत्रिकेच्या (छायाप्रतीच्या) पुनर्मूल्यांकनाबाबत
## -विषय शिक्षकाचा अभिप्राय -
### माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा
### फेब्रुवारी-मार्च/सप्टेंबर-ऑक्टोबर २०१

विषय ---------------------------------------- पेपर / भाग ------------ दिनांक ------------

मी (शिक्षकाचे पूर्ण नांव ) :-----------------------------------------------------
शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात ---------------------------- या पदावर कार्यरत असून इ.१० वी/
इ.१२ वीला -------------------------------- हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा फेब्रुवारी-मार्च / सप्टेंबर-ऑक्टोबर २०१ च्या माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी आमच्या शाळेमार्फत / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत परीक्षेसाठी आवेदनपत्र मंडळाकडे सादर करून परीक्षेस प्रविष्ट झाला आहे. सदर विद्यार्थ्याने मंडळाकडून वर नमूद केलेल्या विषयाच्या / पेपर / भागाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत घेतली असून त्यास पुनर्मूल्यांकनासाठी मंडळाकडे अर्ज करावयाचा आहे. त्यासाठी सदर विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची मी नमुना उत्तरे व गुणदान योजनेच्या आधारे तपासणी केली असून मला खालील प्रश्नात / उपप्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून आले आहे. / सर्व प्रश्न / उपप्रश्नांना योग्य गुणदान झाल्याचे आढळून आले आहे.

गुणदान कमी झाल्याबाबत मी खालील प्रमाणे प्रश्ननिहाय सकारण अभिप्राय देत आहे.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची तपासणी
करणा-या विषय शिक्षकाची स्वाक्षरी

मुख्याध्यापकाची/प्राचार्याची प्रतिस्वाक्षरी
शाळेचा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टीप : १. ज्या विषयात दोन पेपर/भाग आहेत अशा विषयाच्या बाबतीत विषय शिक्षकाचा अभिप्राय दोन्ही पेपर/भाग यासाठी स्वतंत्र असावा.

२. उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी आपल्या शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून मुदतीत करून घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.